# नि. दि. दा. क्र. ३०८/२०१८ मधील नि. ५ वरील आदेश
## ( मारुती चव्हाण वगैरे वि. अमोल दरवंदर वगैरे )

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दि.प्र.सं. आदेश ३९ रुल १, २ व कलम १५१ प्रमाणे दाखल करून प्रतिवादी नं. १ ते ४ यांच्याविरूध्द दावामिळकतीमध्ये घुसुन वादींच्या पिकांची, झाडांची नासधूस करू नये अगर वादीच्या जमिनीत नव्याने कोणताही रस्ता करून नवीन वहिवाटीचा हक्क प्रस्तापित करू नये म्हणून अंतरिम तुर्तातुर्त मनाई मागितलेली आहे.

२. वादीच्या अर्जातील थोडक्यात कथन असे की, दावामिळकतीच्या पश्चिम बाजूस गट नं.७५५ ची जमीन असून सदरची जमीन दक्षिणेकडील खंडेराजूरी डांबरी रस्त्यापासून सुरु होवून उत्तरेकडील ओढयापर्यत जावून टेकलेली आहे. वादीच्या जमिनीत द्राक्षबाग व बागायत पिके आहेत. गट नं. ७५६ व ७५५ च्या सरबांधावरून कोणताही सरकारी अगर वहिवाटीचा रस्ता आस्तित्वात नव्हता व नाही. वादीनी त्यांच्या जमिनीत जाणेयेणेसाठी व पिकांची व स्वतःची वाहतूक करणेकरीता अंतर्गत खाजगी रस्ते सोडलेले आहेत. ते खाजगी असून त्यामध्ये कोणाचाही वहिवाटीचा हक्क नाही. वादीची जमिन दक्षिणेकडून उत्तरेकडे खोल गेलेली आहे. उत्तरेस २०० फुट रुंदीचा ओढा असून त्याची खोली २० फुट आहे व त्याममध्ये १२ माहे पाण्याचा प्रवाह असतो. सदर ओढयातून जाणेयेणेसाठी कधीही रस्ता नव्हता अगर रस्ता करणेसारखी परिस्थीती नाही. प्रतिवादीच्या जमिनी या ओढयाच्या पलीकडे उत्तर बाजूस आहेत. त्यांच्या जमिनीलगत खंडेराजूरी सरकारी रस्ता पूर्वापार आहे. त्याच रस्त्याने प्रतिवादीची पूर्वापार वहिवाट होती व आहे. ओढयाच्या दक्षिण बाजूकडे वादीच्या जमिनीतून जाणेयेणेकरीता प्रतिवादींना कोणताही हक्क व अधिकार नाही. अशी वस्तुस्थिती असताना प्रतिवादी व इतर काही शेतक-यांनी मिळून मा. तहसिलदार मिरज यांचेकडे दि मामलतदार ॲक्टचे कलम ५ प्रमाणे दावा गट नं. ७५६ व गट नं. ७५५ च्या सरबांधावर पूर्वापार वहिवाटीचा रस्ता आहे असे कथन करून सदरचा रस्ता

वहिवाटीकरीता खुला करून मिळावा याकरीता क्र.रस्ता वहिवाट केस नं.१८/२०१७ चा दाखल केला. वरील केसचे कामी वादी नं. १ व २ चे वडील मारुती दादू चव्हाण हे दि.१३/०१/२०१७ रोजी मयत असताना मा. तहसिलदार यांनी मयताचे विरूध्द दि.३०/०६/२०१८ रोजी आदेश करून प्रतिवादींचा अर्ज मंजूर केला. त्यामुळे प्रथमदर्शनी मयताविरूध्द पारीत केलेला मा. तहसिलदार, मिरज यांचा आदेश पूर्णतः खोटा व चुकीचा आहे.गट नं. ७५५ व ७५६ च्या शिवेवर विहीर व आंब्याची व इतर फळझाडे आहेत. तसेच गट नं. ७५५ च्या हद्दीपर्यंत चालू द्राक्षबाग आहे. ही सर्व परिस्थीती असताना मा. तहसिलदार यांनी केलेला पंचनामा व दिलेला आदेश सकृतदर्शनी चुकीचा आहे. प्रस्तुत दावेचा गुणदोषावर निर्णय होणेस बराच कालावधी आहे. परंतु दि.२४/१०/२०१८ रोजी प्रतिवादींनी वादींना रस्ता करण्याची धमकी दिल्यामुळे प्रतिवादी हे दांडगाव्याने अंगजोरावर वादीच्या मिळकतीमध्ये घुसुन वादीच्या वहिवाटीस हरकत व अडथळा करून, पिकांची व झाडांची नासधुस करून, नव्याने रस्ता करण्याचा प्रयत्न करण्याची व नसणारे हक्क प्रस्थापित करण्याची शक्यता वादीस वाटल्याने वादीने त्यास प्रथमदर्शनी केस असल्याचे कथन करून व बॅलन्स ऑफ कन्व्हीनियन्स तसेच ग्रेटर हार्डशिप वादीलाच होणार आहे असे सांगून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी वादीच्या अर्जास नि.३९ कडे म्हणणे दाखल करून वादीचा अर्ज व त्यातील कथने नाकारलेली आहेत. त्यांच्या कथनानुसार मा. तहसिलदार मिरज यांनी क्र. रस्ता/एस आर/१८/२०१७ मध्ये दि मामलेदार ॲक्टचे कलम ५ नुसार दिलेला निकाल हा अर्जदार व जाबदार यांचे म्हणणे कागदपत्रे व पंचनामा याचे अवलोकन करून गुणावगुणावर दिलेला आहे. त्याकामी वादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्याची व हरकती उपस्थित करण्याची पूर्ण संधी देण्यात आली होती. सदरचे प्रकरण कायदयातील तरतुदीनुसार चालून निकाली झालेने त्याबाबत तक्रार उपस्थित करण्याचा वादी यांना कायदेशीर अधिकार नाही. वस्तुतः प्रतिवादी यांनी त्यांचा तक्रारी अर्ज दि.०९/०५/२०१७ रोजी मा. तहसिलदार यांचेकडे दिल्यानंतर मंडल अधिकारी,

मालगांव यांनी जा.र.नं.२३२/२०१७ अन्वये यातील वादींना नोटीसा काढून दि.१९/०६/२०१७ रोजी हजर राहणेबाबत कळविले होते व त्या अनुषंगाने दि.०४/०७/२०१७ रोजी वादातील रस्त्याची पाहणी करून पंचनामा केलेला आहे. त्यावेळी वादी हे हजर राहिले परंतु त्यांनी कोणत्याही तक्रारी उपस्थित केल्या नाहीत. गट नं. ७५५ व ७५६ च्या जमिनीच्या मधून दक्षिण उत्तर चालीचा गाडी रस्ता आस्तित्वात होता व आहे व त्या रस्त्यानेच प्रतिवादींची वहिवाट चालू आहे. सदर रस्त्यानेच प्रतिवादी हे शेतीची औजारे ने–आण करणे, शेतीमालाची आवक जावक करणे, वस्तीतील मुलांची शाळेकरीता जाणे–येणे अशाप्रकारची शेतीची सर्व कामे व वस्तीतील सर्व लोकांची ये–जा करण्याची वहिवाट याच रस्त्याने आहे. परंतु प्रतिवादींनी सदरचा रस्ता नांगरणे, कातरणे, रस्त्यामध्ये मोठे दगड, काटे टाकणे असे कृत्य करू लागल्याने प्रतिवादींनी रस्त्याबाबतचा अर्ज दाखल केला होता. अर्ज मंजूर झालेस पूर्वापार वहिवाटीचा रस्ता बंद होवून प्रतिवादी यांना त्यांच्या जमिनीची कष्ट मशागत करणे, शेती माल व औजाराची ने–आण करणे दुरापास्त होईल. तसेच इनाम वस्ती व आसपासच्या कुटुंबियांना दळणवळण करण्यासाठी अडचणीचे होणार आहे. त्यामुळे सकृतदर्शनी केस वादीवतीने नसून न्यायाचा तराजू हा प्रतिवादीच्या वतीने आहे व ग्रेटर हार्डशीपही प्रतिवादीसच होणार असल्याने वादीचा अर्ज खर्चासहित नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. वादींच्या कथनांनुसार खालील वादप्रश्न न्यायालयासमोर निर्णयाकरीता उपस्थित झाले असून त्यावरील निर्णय हे न्यायालय कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **वादप्रश्न** | **निर्णय** |
|---|---|---|
| १. | दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने आहे काय? | नकारार्थी |
| २. | सदरचा अर्ज नामंजूर केल्याने वादीचे कधीही न भरुन | नकारार्थी |

येणारे नुकसान होणार आहे काय?

| | | |
|---|---|---|
| ३. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय? | नामंजूर. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत

५. वादी यांनी दावेचे कामी तहसिलदार, मिरज यांनी रस्ता वहिवाट केस नं. १८/२०१७ चे कामी दि.३०/०६/२०१८ रोजी दिलेला निर्णय वादींवर बंधनकारक नाही अशी हक्कज्ञापनाची मूळ दाद मागितलेली असून सदरचा आदेश सकृतदर्शनी कसा बेकायदेशीर व चुकीचा आहे हे दाखवण्याकरीता नि.३/१ ते ५ कडे मौजे खंडेराजूरी येथील गट नं. ७५६, ७५५, ७३६, ७५७ व ७६० चे दि.२३/१०/२०१८ रोजीचे ७/१२ उतारे, नि.३/६ कडे फेरफार नं. १०१७१ चा उतारा, नि.३/७ कडे क्र. रस्ता वहिवाट क्र.१८/२०१७ मधील प्रतिवादींचा मुळ अर्ज, नकाशा व लेखी म्हणणे, नि. ३/८ कडे क्र. रस्ता वहिवाट क्र. १८/२०१७ मधील निकाल, नि.३/९ कडे प्रतिवादींच्या जमिनीचे फोटो, नि.३/१० कडे ओढा व बंधा–याचे फोटो, नि.३/११ कडे ओढयाकडचे गट नं. ७५६ चे दोन फोटो, नि.३/१२ कडे मारुती दादू चव्हाण याचा मृत्यू दाखला इ. कागदपत्रे हजर केलेली आहेत. तसेच नि.४५/१ कडे वादीने ओढयाचे सदयस्थितीतील फोटो व नि. ४५/२ कडे ग्रामपंचायत खंडेराजूरी, ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेला दाखला हजर केलेला आहे.

६. प्रतिवादी यांनी नि. ३९ कडे वादीच्या अर्जास म्हणणे दाखल करून वादींचा अर्ज नाकारलेला आहे व मा. तहसिलदार यांचा आदेश सकृतदर्शनी कसा योग्य व बरोबर आहे हे दाखवण्याकरीता नि.४७/१ कडे मंडल अधिकारी, मालगांव यांनी जा.रं.नं.२३२/२०१७ चे कामी दि.१९/०६/२०१७ रोजी पाठवलेली नोटीस,

नि.४७/२ कडे सदर प्रकरणात प्रतिवादी यांनी दिलेले त्यांचे लेखी म्हणणे, मंडल अधिकारी, मालगांव यांनी सदर प्रकरणात दि.०४/०७/२०१७ रोजीचा पंचनामा नि.४७/३ कडे, मा. तहसिलदार यांनी दि.१०/०१/२०१८ रोजी केलेला पंचनामा नि. ४७/४ कडे, दि.१०/०१/२०१८ रोजी वादीनी मा. तसहसिलदार, मिरज यांचेसमोर दिलेल्या दि.१०/०१/२०१८ रोजीच्या जबाबाची स.शि.प्रत हजर केलेली आहे.

७. वादीतर्फे विद्वान वकीलांनी युक्तीवादादरम्यान असे सांगितले की, वादी नं. १ व २ चे पूर्वहक्कदार हे दि.१३/०१/२०१७ रोजी मयत असताना मा. तहसिलदार यांनी क्र.रस्ता वहिवाट मधील केसचा निकाल ३०/०६/२०१८ रोजी घोषित करून मयताविरूध्द आदेश पारीत केलेले आहेत. त्यामुळे तहसिलदार यांचा आदेश बेकायदेशीर आहे. तसेच प्रतिवादींचा अर्ज हा दि. मामलतदार ॲक्टचे कलम ५(२) नुसार मुदतीत नसतानाही त्याची चौकशी केली व निकाल दिला. प्रतिवादीना अन्य पर्यायी रस्ता उपलब्ध असताना व ओढयामध्ये पाणी असताना ही ओढापात्रातून मंजूर केलेला रस्ता हा सकृतदर्शनी बेकायदेशीर असाच आहे. वादीच्या क्षेत्रातील रस्ता हा त्यांच्या खाजगी वहिवाटीचा असून तो प्रतिवादींना वापरता येणार नाही. सध्या दावामिळकतीत वादींची द्राक्षबाग असलेने अर्ज नामंजूर झालेस वादीच्या शांततामय वहिवाटीस हरकत होवून वादीचे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती वादीने केली.

८. प्रतिवादीतर्फे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी यांनी वादातील रहदारीचा रस्ता खुला होवून मिळणेबाबत दि.०९/०५/२०१७ रोजी प्रथम तक्रारी अर्ज मा. मंडल अधिकारी, मालगांव यांचेकडे दिल्यानंतर त्याच्या नोटीसा दि.१९/०६/२०१७ रोजी वादी व प्रतिवादीना काढण्यात आल्या व त्याप्रमाणे दि.०४/०७२२०१७व दि.१०/०१/२०१८ रोजी पंचनामे मंडल अधिकारी व मा. तहसिलदार यांचेसमोर पंचनामे, वादींचे जबाब व इनाम वस्तीतील रहिवाशीचे जबाब

नोंदवून योगय पणालीचा वापर करून मा. तहसिलदार यांनी आस्तीत्वात असणारा रहदारीचा रस्ता खुला करून देणेबाबत आदेश केला आहे. त्यामुळे वादीचा मुदतीबाबतचा आक्षेप चुकीचा आहे. त्यामुळे मनाई झालेस प्रतिवादी तसेच इनाम वस्तीत राहणा–या रहिवाशींचे रस्त्याअभावी जाणे–येणेच्या वहिवाटीस हरकत होवून त्यांचे नुकसान होणार आहे. वादी यांनी मूळ प्रोसिंडींगचे कामी मा. तहसिलदार यांचेसमोर स्वतःचे म्हणणेही नोंदवले नाही व मारुती चव्हाण मयत असलेबाबत कळविले नाही. त्यामुळे वादीना दावा करून तसा आक्षेप नोंदविता येणार नाही, असे कथन करून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

९. मा. तहसिलदार यांचेसमोर क्र. रस्ता वहिवाट केस नं. १८/२०१७ चालले व त्याच्या नोटीसा वादी व प्रतिवादी या सर्वांना होत्या व त्याकामी पंचनामेही झालेले आहेत याबाबत वादीचे अगर प्रतिवादीचे दुमत नाही. नोटीसा प्राप्त होवून ही वादीने त्यांचे रीतसर म्हणणे व हरकती मंडल अधिकारी, मालगांव यांचेकडे उपस्थित केल्या नाहीत हे वादीनीच नि.३/८ कडे हजर केलेल्या मा.तहसिलदार यांच्या निकालपत्रातील मजकूरावरून दिसते. गट नं. ७५६ व ७५५ मध्ये वहिवाटीचा रस्ता असल्याचे व त्यावरील अडथळा दूर करणेबाबातचे आदेश मा. तहसिलदार यांनी दिलेला असताना दावा हा केवळ गट नं. ७५६ पूरता दिसतो. गट नं. ७५५ चे धारक याकामी प्रतिवादी नं. ५ असून त्यांनी कोणतीही हरकत याकामी उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदयस्थितीत गट नं. ७५५ चे धारकास मा. तहसिलदार यांच्या आदेशाबाबत हरकत नसल्याचे दिसते. वादीनी याकामी ज्या काही तक्रारी उपस्थित केलेल्या आहेत त्या सर्व तक्रारी उपस्थित करण्यीच संधी मा तहसिलदार यांनी क्र. रस्ता वहिवाट केस नं. १८/२०१७ चे कामी नैसर्गिक न्यायत्त्वानुसार वादीना दिली होती असे नि.४७/१ कडील नोटीसीवरून दिसते व वादीने ते कबूल ही केलेले आहे. परंतु, वादीनी त्या तक्रारी तिथे उपस्थित न करता प्रथमतः दावेचे कामीच उपस्थित केलेल्या दिसतात. मा. तहसिलदार यांचा आदेश सकृतदर्शनी चुकीचा आहे हे दाखवण्यासाठी वादीने सदर प्रकरणातील सर्व जबाब, पंचनामे, नोटीसा व कागदपत्रे न्यायालयासमोर आणणे

आवश्यक होते. परंतु यासंदर्भातील कागदपत्रे वादीनी न्यायालसमोर आणली नाहीत. याउलट प्रतिवादीनी ती सर्व कागदपत्रे व त्यांच्या स.शि. प्रती नि.४७/अनं. १ते ९ कडे हजर केलेली आहेत. या कागदपत्रावरून प्रथम दि.०९/०५/२०१७ रोजी प्रतिवादीनी गट नं. ७५५ व ७५६ मधील वहिवाटीचा रस्ता खुला करणेबाबतचा अर्ज दिला होत. त्याप्रमाणे दि.१९/०६/२०१७ रोजी वादी प्रतिवादीना नोटीसा काढणेत आल्या. दि.२८/०६/२०१७ रोजी प्रतिवादीनी त्यांचे म्हणणे सादर केले. मंडल अधिकारी, मालगांव यांनी वादातील रस्ता आस्तीत्वात असलेबाबत व तो रस्ता यातील वादीनी बंद केलेबाबतचा पंचनामा दि. ०४/०७/२०१७ रोजी केल्याचे मा. तहसिलदार यांनी ही ८ ते १० फुटाचा वादरस्ता आस्तीत्वात असलेचे व त्या रस्त्यावर नांगरणी करून, रोटर मारुन, दगड व कचरा टाकून वहिवाटीचा रस्ता बंद केलेचा दि.१०/०१/२०१८ रोजीचा पंचनामा केलेबाबत, वादातील रस्ता आस्तीत्वात असलेबाबतचा दि.१०/०१/२०१८ रोजीचा वादीचा जबाब व सदरचा वादातील रस्ता ७० वर्षापासून वापरत असलेबाबतचा इनाम वस्तीतील एकंदरीत दहा रहिवाशांचा दि.१०/०१/२०१८ रोजीचा मा. तहसिलदार समोरील जबाब पाहता सकृतदर्शनी मा. तसहसिलदार यांचा आदेश चुकीचा व बेकायदेशीर दिसत नाही. वादीनी प्रतिवादींच्या रस्त्याबाबतच्या अर्जाबाबत मुदतीची हरकत उपस्थित करून नि.३/७ कडे प्रतिवादींचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु सदरचा अर्ज दाखल करणेपूर्वीची वस्तुस्थिती व कागदपत्रे वादीनी अभिलेखावर हजर न करता ती बाब न्यायालयापासून लपवून ठेवली असल्याचे नि. ४७ कडील कागदावरून दिसत असल्याने वादीची मुदतीबाबतची दाद योग्य वाटत नाही.

१०. वादी नं. १ व २ चे पूर्वहक्कदार मयत मारुती दादू चव्हाण यांच्या मयताबाबतचा आक्षेप नोंदवल्यानंतर ही मा. तहसिलदार यांचा आदेश झाला असता तर त्या परिस्थीतीत सदरचा आदेश मयताविरूध्द आहे असे म्हणणे सदयस्थितीत योग्य वाटले असते. परंतु वादी नं. ३ व ४ हे मा. तहसिलदार यांचेसमोरील प्रकरणात हजर होते व त्यांनी त्यांचे जबाब नोंदवताना मारुती चव्हाण यांच्या मृत्यूबाबतची माहिती देणे

आवश्यक असताना ती त्यांनी दिलेली नाही. ही स्थिती सदयस्थीतीत दिसत असताना व मा. तहसिलदार यांनी दि. मामलतदार ॲक्टचे कलम ५(२) नुसार वहिवाटीचा रस्ता खुला करून देण्याकरीता आवश्यक असलेली सर्व कार्यवाही केलेचे प्रतिवादीनी नि.४७ कडील कागदांवरून न्यायासमोर सकृतदर्शनी आणली असताना सदरील सर्व कागदपत्रे व त्याबातची वस्तुस्थीती वादीनी कोर्टापासून लपवल्याचे समोर दिसत असल्याने वादी हा स्वच्छ हातानी (by clean hands) नी कोर्टासमोर आला नसल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झालेने वादीस अंतरीम मनाईसारखी ऐच्छीक दाद देता येणार नाही. अशाप्रकारे वादीने स्वतःच्या वागण्यानेच (conduct) ने त्यास सकृतदर्शनी केस नाही असे दाखवून दिले असल्याने मुद्दा क्र. १ चे उत्तर हे न्यायालय नकारार्थी देत आहे.

## <u>मुद्दा क्र. २ बाबत</u>

११. वादीने दावा अर्ज कलम ३ मध्ये तसेच मा. तहसिलदार यांचेसमोरील जबाब नि.४७/५ मध्ये वाद रस्ता आस्तीत्वात असलेचे कथन केले आहे. त्यामुळे प्रतिवादी नवीन रसता करण्याच्या प्रयत्नात आहेत हा वादीचा युक्तीवाद व कथन याठिकाणी पटत नाही. अशा स्थितीत अर्ज नामंजूर झाल्यास वादीच्या हक्काचे अपरिमित नुकसान होईल असे या न्यायालयास वाटत नसल्याने मुद्दा क्र. २ चे उत्तर हे न्यायालय नकारार्थी देत आहे.

## <u>मुद्दा क्र. ३ बाबत</u>

१२. अर्ज नामंजूर झाल्यास आस्तीत्वात असणा–या रस्त्यावरील पूर्वापार वहिवाटी दावेच्या अंतिम निकालापावेतो चालू राहून वादींच्या हक्काचे कसलेही नुकसान होणार नाही. दावा रस्ता, त्यावर असणारी झाडे व बंद स्थीतीतील अंगणवाडीची स्थिति दि.१०/०१/२०१८ च्या पंचनामेने दिसत असल्याने अर्ज मंजूर झाल्यास वहिवाटी अभावी प्रतिवादीचे वहिवाटीच्या हक्काचे नुकसान होणार आहे या दोन्ही नुकसानीचा विचार केल्यास प्रतिवादीना होणारे नुकसान मोठे असल्याने न्यायाचे समतोलत्व

प्रतिवादी वतीने आहे असे मत नोंदवून मुद्दा क्र. ३ चे उत्तर हे न्यायालय नकारार्थी देत आहे.

## मुद्दा क्र. ४ बाबत

१३. मुद्दा क्र. १ ते ३ चे कामी नोंदविलेल्या निरीक्षणावरून हे न्यायालय मुद्दा क्र. ४ चे उत्तर खालीलप्रमाणे देत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by Urmila Parashram Koli
Date: 2020.11.04 16:41:47 +0530

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. ०३/११/२०२० २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. U. Nadaf |
| Court | : | IInd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 04/11/2020 |
| Judgment/Order uploaded on | : | 04/11/2020 |